REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# चारापाणी : कृषी मूलक जाणिवांचा सर्वोत्तम आविष्कार

प्रा.डॉ.भगवान नन्नावरे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय,नागपूर.


**KEY NOTE :** **कृषिवलांच्या प्रश्नांना मुखर करणारी आणि शेतकऱ्यांच्या विचारांना नवी दिशा देणारी महत्त्वपूर्ण कादंबरी 'चारापाणी'.**

**ABSTRACT :** **'चारापाणी' ग्रामीण कादंबरीतील प्रयोगशीलतेचे उत्तम उदाहरण म्हणता येते. कलेचे भान ठेवून झालेला सर्वोत्तम अविष्कार ठरते. 'दुष्काळ' या समस्येचे केंद्र अखेरपर्यंत टिकवून ठेवणारी आणि अनुभवांचे प्रामाणिक प्रकटीकरण करणारी यशस्वी कादंबरी होय.**

## प्रास्ताविक :

मराठी ग्रामीण कादंबरीच्या समृद्ध परंपरेच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे रा.रं.बोराडे यांची चारापाणी ही कादंबरी होय. साठोत्तरी मराठी ग्रामीण साहित्याच्या प्रवाहातील एक महत्त्वाचे ग्रामीण कादंबरीकार म्हणून रा.रं.बोराडे हे सर्वपरिचित आहेत. बोराडे यांनी मराठवाड्यातील ग्रामीण कृषी जीवनाचे धगधगते वास्तव आपल्या कादंबरी लेखनातून सामोरे आणले आहे. मराठवाड्यासारख्या मागास भूप्रदेशात जीवन जगणाऱ्या आणि सातत्याने दुष्काळाच्या छायेत वावरणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनाची होणारी वाताहत बोराडे यांनी आपल्या कथा—कादंबरी लेखनातून अत्यंत नेमकेपणाने टिपलेली आहे. त्यांची चारापाणी ही कादंबरी अशाच दुष्काळाच्या भयावह वास्तवाचे नेमके चित्रण साकार करणारी कादंबरी आहे. या कादंबरीतून सातत्याने दुष्काळाला तोंड देणाऱ्या माणसांच्या जगण्याची होरपळ अत्यंत तीव्र शब्दात अधोरेखित केली आहे.

शेतकऱ्यांच्या जीवनात शेतीसाठी पूरक असणाऱ्या पशु—प्राण्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. एखाद्या वर्षी पाऊस न पडल्यामुळे दुष्काळ पडून जेव्हा त्यांच्या या पशुधनावर उपासमारीची वेळ येते, तेव्हा त्यांच्या जीवाची प्रचंड घालमेल होत असते. या घालमेलीतून सावरण्यासाठी प्रयत्न करणारे आणि प्रसंगी शासनव्यवस्थेशी लढा देणारे शेतकरी या कादंबरीतून चित्रित होतात. म्हणूनच ही कादंबरी कृषी मूलक जाणिवांचा सर्वोत्तम अविष्कार म्हणून मराठी साहित्यामध्ये चर्चिली गेली आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या अनुषंगाने रा.रं.बोराडे यांचे कृषीवलांविषयीचे सूक्ष्म निरीक्षण आणि त्यांच्या आयुष्यातील प्रश्नांची बोराडे यांच्या चिंतनातून साकार झालेली उकल विचारात घेता येईल.




मराठवाडा हा भूप्रदेश प्रामुख्याने दुष्काळी प्रदेश म्हणून ओळखला जातो. या भूप्रदेशात राहणारे लोक हे प्रामुख्याने ग्रामीण भागात वास्तव्यास असणारे लोक आहेत. ग्रामीण भागातील या लोकांचा प्रधान व्यवसाय हा शेती आहे. शेती व्यवसायावर आपला उदरनिर्वाह करणारी आणि सातत्याने संकटाला तोंड देणारी माणसं मराठवाड्यात राहतात. अशाच मराठवाड्याच्या भूप्रदेशात जन्माला आलेले रा.रं.बोराडे यांनी लहानपणापासूनच दुष्काळाच्या झळा स्वत:

सोसलेल्या होत्या. शेतकरी कुटुंबात जन्माला आल्यामुळे बोराडे यांना सातत्याने बुडीत असणारा शेती व्यवसाय आणि त्याला तारण्यासाठी धडपडणारा शेतकरी हा संघर्ष लहानपणापासून पाहिलेला होता. म्हणूनच जाणतेपणात बोराडे यांनी या संघर्षाची जाणीव समाजमनाला झाली पाहिजे आणि व्यवस्थेपुढे हे प्रश्न उभे राहिले पाहिजेत या पोटतिडकीने आपले लेखन केलेले आहे. अशा वास्तव आणि विविधांगी समकालीन जीवनावर भाष्य करणारे बोराडे हे म्हणूनच ग्रामीण जीवनाचे भाष्यकार ठरतात. शिक्षणाची कसलीही परंपरा नसलेल्या एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या बोराडे यांना आपल्या लेखनाविषयी आणि लेखनाच्या जाणीवाविषयी नोंदविलेले प्रामाणिक मत विचारात घेतले म्हणजे त्यांच्या व्यक्तीत्वातील नेमकेपणा आणि प्रामाणिकपणा लक्षात येतो. ते म्हणतात,''आपल्याला लिहिता येतं ही जाणीव मनात रुजली अशी जाणीव मनात रुजणं माझ्या दृष्टीने फार मोलाचं होतं. मराठवाड्यातल्या एका शेतकरी कुटुंबातला मुलगा आई—वडिलांची मराठी अक्षरांची किंचितही ओळख नव्हती. मॅट्रिकला असताना मी ही गोष्ट लिहिली खरी पण लेखक कसा असतो, हे मी तोपर्यंत पाहिले देखील नव्हतं अशा परिस्थितीत आपल्याला लिहिता येतं ही जाणीव मनात माझ्या लेखनाविषयी वाटचालीच्या दृष्टीने फार मोलाचं ठरलं.''[१] बोराडे यांनी स्वत:च्या अभिव्यक्ती संदर्भातील ही पार्श्वभूमी अधोरेखित करताना लेखक निर्मितीची प्रक्रिया कशा पद्धतीने त्यांच्या मनात रुजत गेली हे स्पष्ट केले आहे. यावरून त्यांच्या लेखनातून साकार झालेला जगण्याविषयीचा तळदर्शीपणा दिसून येतो.

शेती, शेतकरी आणि त्यानिमित्ताने उद्‌भवणाऱ्या समस्या व प्रश्न हे बोराडे यांच्या चिंतनाचे प्रमुख विषय आहेत. त्यांची चारापाणी ही कादंबरी अशाच शेतकऱ्याच्या जीवनाला पिढ्यान्‌पिढ्या ग्रासून असणाऱ्या प्रश्नाला केंद्रवर्ती ठेवून लिहिलेली कादंबरी आहे. दुष्काळ हा सातत्याने कृषी व्यवस्थेला उध्वस्त करू पहात आलेला आहे. या दुष्काळामुळे उद्‌भवणारी एक महत्त्वाची समस्या म्हणजे चारा आणि पाणी. शेतकऱ्याला जेव्हा याची वानवा भासायला लागते, तेव्हा तो हवालदिल होऊन जातो. अशा काळात तो संघर्ष करण्यासाठी प्रवृत्त होतो. अशाच एका तरुण शेतकऱ्याच्या संघर्षाचे प्रतिनिधित्व करणारी ही कादंबरी आहे. ग्रामीण समाज जीवनाविषयीची बांधिलकी बोराडे यांच्या लेखनातून ओतप्रोत वाहताना दिसून येते. खेड्यातील माणसे ही प्रामुख्याने शेती व्यवसायावर निर्भर असतात आणि शेती व्यवसाय हा प्रामुख्याने निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असतो. त्यातच एखाद्या वर्षी पाऊस कमी पडला. साहजिकच दुष्काळ पडतो. शेतकऱ्यांचे ऐंशीच्या दशकातील भयावह दुष्काळाच्या परिणामांना अधोरेखित करणारी चारापाणी ही कादंबरी म्हणूनच समकालीन वास्तवाचा वेध घेणारी महत्त्वपूर्ण कादंबरी ठरते. या काळाला अनुभवणारे आणि या काळाची झळ सोसणारे लेखक स्वत: बोराडे असल्यामुळे त्यांच्या या कादंबरीतून समकालीन वास्तवाचे नेमके चित्र साकार झालेले आहे. चारापाणी या कादंबरीच्या अभिव्यक्तीचे आणि आशयाचे स्वरूप अधोरेखित करताना डॉ.भिमराव वाघचौरे लिहितात,''साधारणत: १९८४—८५ साली अवर्षणाचा असाच फटका महाराष्ट्राला जाणवला. खरीप आणि रब्बी दोन्ही पिके हातची गेली. नद्या आटल्या आणि विहिरी कोरड्या पडल्या. दुष्काळाची तीव्रता वाढत गेली. अन्नधान्याबरोबरच पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न भेडसावू लागला. माणसासाठी शासनाने रोजगार हमीची कामे काढली. परंतु जनावरांचे काय? ती कशी जगवायची? ती जगली नाहीतर शेताची मशागत कशी होईल? शेताची मशागत झाली नाही तर तो शेतकरी शेतकरी म्हणून कसा उभा राहील? या आणि अशा स्वरूपाच्या सामाजिक प्रश्नांचा वेध घेणारी एक दीर्घकथा १९८६ च्या दिवाळी अंकात 'होरपळ' या नावाने प्रसिद्ध झाली. परंतु विषयाचा आवाका, तीव्रता आणि व्यापकता या दीर्घकथेत सामावणे शक्य नसल्याने त्याच कथानकाला विस्तारित रूप देऊन त्यांची चारापाणी ही ग्रामीण सामाजिक समस्या प्रधान कादंबरी लिहिली''[२] वाघचौरे यांनी नोंदविलेल्या या वरील मतावरून बोराडे यांच्या कादंबरीच्या आशयाचे विविधांगी पदर अधोरेखित होतात. त्याचबरोबर चारापाणी ही कादंबरी शेतकऱ्यांच्या भावविश्वाला घेऊन कशी प्रकट होते ते ही स्पष्ट होते. म्हणूनच शेतकऱ्यांच्या जीवन जाणिवांचा प्रगल्भ विचार घेऊन साकार होणारी ही कादंबरी महत्त्वपूर्ण ठरते.

आधुनिकीकरणाबरोबर शेतीव्यवसायातही प्रचंड स्वरूपात बदल झाला. यांत्रिकीकरणाचा वापर शेती व्यवसायात मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. परंतु शेतातील सर्वच कामे यंत्राने होतील असे नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत शेतातील इतर कामे करण्यासाठी शेतकऱ्यांना बैलांची आवश्यकता लागते. अशा बैलांना सांभाळण्यासाठी शेतकऱ्यांना गरज असते ती चारा आणि पाण्याची. जेव्हा दुष्काळासारखी समस्या उद्‌भवते

तेव्हा चारा आणि पाण्याचा प्रश्न अत्यंत तीव्र होतो. अशातच या प्रश्नाचे भांडवल करून आपली स्वार्थाची पोळी भाजणारे राजकारणी, त्याचबरोबर शासन व्यवस्थेतील अधिकारी यांच्याही भ्रष्ट प्रवृत्तीवर बोराडे यांनी या कादंबरीतून नेमकेपणाने प्रकाश टाकलेला आहे. तसेच शेती व्यवसायाबरोबरच ग्रामीण भागात उद्‌भवलेला विभक्त कुटुंब पद्धतीचा प्रश्नही बोराडे यांनी या कादंबरीतून केंद्रस्थानी ठेवलेला आहे. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे ग्रामीण भागात अल्पभूधारक शेतकरी संख्या दिवसेंदिवस वाढू लागलेले आहेत. तसेच अत्यल्पभूधारक होऊन शासकीय योजनांचा फायदा मिळवण्यासाठी शेतकरी त्या दिशेनेही वाटचाल करू लागलेले आहेत. असा हा अत्याल्पभूधारक शेती व्यवसाय करताना शेतकऱ्याच्या वाट्याला येणारे अनेक प्रश्न या कादंबरीतून अधोरेखित होतात. तसेच निसर्गाने या शेतकऱ्याकडे पाठ फिरवली की शासनही त्याला फारशी मदत करत नाही. अशा जीवघेण्या परिस्थितीला सामोरे जाणाऱ्या शेतकऱ्यांची वास्तव परिस्थिती या कादंबरीतून बोलकी होते.

शिक्षणाने शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मुले शिकू लागली, विचार करू लागली आणि या व्यवस्थेशी लढा देण्यासाठी सज्ज होऊ लागली. अशाच एका सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबातील तरुण सुखदेव हा त्या काळातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे प्रतिनिधीत्व करताना दिसून येतो. प्रसंगी तो गावातील लोकांचे प्रबोधन करून लोकांना दुष्काळ समस्येतून मुक्त होण्यासाठी या शासन व्यवस्थेच्या विरुद्ध लढण्यासाठी प्रवृत्त करताना दिसून येतो. हा सुखदेव सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबातील सुशिक्षित तरुण आहे. अशा सुशिक्षित तरुणांची महाराष्ट्रामध्ये फौज निर्माण झालेली होती. त्याचे प्रतिनिधित्व सुखदेवच्या रूपाने बोराडे यांनी चित्रीत केल्याचे दिसून येते. बोराडे यांच्या लेखनातील या दृष्टिकोनावर भाष्य करताना डॉ.रामचंद्र काळुंखे लिहितात,''चारापाणी मध्ये बोराडे यांनी दुष्काळग्रस्त ग्रामीण जीवनातील पाणी आणि प्रामुख्याने चाऱ्याच्या कमतरतेमुळे निर्माण होणारी समस्या मांडली आहे. रा.रं.बोराडे यांच्या इतर कादंबऱ्यांच्या तुलनेत चारापाणी ही एकमेव कादंबरी सामाजिक समस्येला थेटपणे भिडणारी कादंबरी आहे. या कादंबरीचा नायक सुखदेव असला तरी त्यांनी हाती घेतलेले कार्य आणि त्यातून उलगडत जाणारी दुष्काळाची समस्या, दुष्काळाकडे पाहण्याचा निराळा दृष्टीकोण, उपायांच्या वेगवेगळ्या शक्यता सूचित होतात. सुखदेव उच्चशिक्षण घेऊन परत गावी आलेला युवक आहे. विद्यार्थीदशेपासून त्याचे समाजकार्य दिसून येते. सुखदेव गावातील दुष्काळ पाहतो आणि त्याला चाऱ्याअभावी निर्माण झालेल्या समस्यांमुळे शेतकऱ्यांचे अस्तित्व धोक्यात येईल अशी भीती वाटते. गावातील शेतकऱ्यांचे बैल त्यांच्याकडेच राहावेत, यासाठी चाऱ्याची उपलब्धता व्हावी म्हणून सुखदेव अधिकारी, पदाधिकारी यांना भेटून मदतीची अपेक्षा करतो. यश येत नाही. शेवटी सुखदेव लोकांचे प्रबोधन करतो. त्यांच्याबरोबर सहभागातून जनआंदोलन उभे करतो. शेतकरी आणि बैल यांच्या सहभागाने 'मेक मारो' आंदोलन उभे राहते''[3] काळुंखे यांनी बोराडे यांच्या कादंबरीतून साकार झालेल्या शेतकऱ्याच्या प्रश्नाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तरुणांचे चित्रण बोराडे यांनी कसे केले आहे. ते अधोरेखित करून या संघर्षातून नवा विचार, नवी प्रेरणा, शेतकरी वर्गात कशा पद्धतीने रुजवली जात होते ते स्पष्ट केले आहे.

दिवसेंदिवस जटील होत जाणाऱ्या पाणी प्रश्नावर बोराडे यांनी केलेले भाष्य खरेच विचार करण्याजोगे आहे. एकूणच शेतकरी आणि त्याचे जीवन हे खऱ्या अर्थाने पावसावर अवलंबून असते. दुष्काळ जेव्हा पडतो, तेव्हा तो शेतकऱ्यांच्या आयुष्यात अनेक प्रश्न निर्माण करून सोडतो. अशाच अनंत प्रश्नांचा वेध घेणारे आणि त्याचबरोबर त्या प्रश्नावर उपाय सुचविणारे लेखन या कादंबरीच्या रुपाने झालेले आहे. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न हा केवळ सुखदेव आणि त्याच्या कुटुंबा पुरताच मर्यादित नाही तर निसर्गाच्या प्रकोपाने उध्वस्त झालेल्या प्रत्येक शेतकरी कुटुंबाचा तो प्रश्न असल्याने बोराडे यांची ही कादंबरी कृषीवलांचे भावविश्व कवेत घेऊ पाहणारी महत्त्वपूर्ण कादंबरी ठरते. या कादंबरीतून साकार झालेले वेगवेगळे घटनाप्रसंग, पाण्याचे महत्त्व अधोरेखित करण्याबरोबरच येणाऱ्या काळात उद्‌भवणाऱ्या पाणी समस्येचेही सूतोवाच करताना दिसून येतात. गावात टँकरने पाणीपुरवठा करण्याची उपाययोजना शासनाच्या वतीने राबवली जाते. परंतु त्याही ठिकाणी गावातील पुढारी वर्गाकडून भ्रष्टाचार होतो आणि गावाला पिण्याच्या पाण्याचीही समस्या निर्माण होते. बोराडे यांनी पाणी या प्रश्नाभोवती निर्माण होणारे परस्पर विरोधी ताण–तणावही या कादंबरीतून रचनात्मक दृष्टीने पुढे केलेले आहेत. या प्रत्येक पातळीवर होणारे चित्रण वाचकांना अंतर्मुख करून सोडते. या कादंबरीतून बोराडे यांनी समाजाला दिलेल्या नव्या

विचारांना, नव्या दिशेला अधोरेखित करताना मधु जामकर लिहितात,''आजवर तुमचे लेखन ग्रामीण जीवनातील मानवी प्रवृत्तीशी निगडीत राहीलेले. जय देवचा आंतरिक संघर्ष आणि त्याभोवती जमलेली इतर माणसे यांचे नाते तुमच्यामुळे लेखणीतून समृद्ध झाले आहे. पण चारा पाण्याची समस्या ही ग्रामीण भागातल्या पशुधनाच्या अस्तित्वाशी निगडित असलेली समस्या टिपताना तुम्ही माणसातल्या प्रवृत्तींचा आधार घेत नव्या दालनाची रूपरेषा रेखाटली आहे हे विशेष. शेतकऱ्यांचे मग तो कोरडवाहू की बागायतदार असो अस्तित्व पशुधनावर असते. म्हणून चारा—पाणी या समस्येकडे गांभीर्याने बघणे व वेळीच समस्या सोडविणे आवश्यक आहे. हे तुमचे मत पुन्हा मानवी मनाच्या समस्यांशी निगडीत आहे.''[४] मधु जामकर यांनी बोराडे यांच्या लेखनाचा एकूण कल शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कसा एकरूप झालेला आहे ते अधोरेखित केले आहे. शेतकऱ्यांच्या आयुष्यात निर्माण झालेले प्रश्न आणि अशा प्रश्नांना सामोरे जाताना त्याला करावा लागणारा संघर्ष, त्यातच माणूस माणूसपणापासून परावलंबी होताना निसर्गाबरोबरच माणसानेही शेतकऱ्यांच्या आयुष्यात कशा पद्धतीचे प्रश्न उभे केले आहेत ते स्पष्ट होते.

बोराडे यांच्या लेखनाला प्रामुख्याने ग्रामीण समाजजीवन, तिथला माणूस, त्या माणसाच्या आयुष्यात निर्माण होणारे प्रश्न, त्याच्या आयुष्यातील समस्या याच प्रेरणा रूप घेऊन आलेल्या आहेत. या कादंबरीच्या अनुषंगाने बोराडे यांच्या लेखनाचा अविष्कार विचारात घेतला तर माणसाच्या व्यक्तिगत, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, राजकारण, आत्मक विश्लेषणावर भर देण्याबरोबरच कृषीवाल्यांच्या आयुष्यात दिवसेंदिवस निर्माण होणाऱ्या जटिल प्रश्नाला ते केंद्रवर्ती ठेवून विचारप्रवृत्त करून सोडतात.

## समारोप :

सारांश रूपाने असे सांगता येते की, रा.रं.बोराडे हे १९८० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीला समृद्ध करणारे एक महत्त्वाचे ग्रामीण कादंबरीकार आहेत. बोराडे यांनी आपल्या कादंबरी लेखनातून खऱ्या अर्थाने ग्रामीण शेती, शेतकरी आणि त्या अनुषंगाने निर्माण होणारे प्रश्न अधोरेखित केले आहेत. केवळ प्रश्न मांडून ते थांबत नाहीत तर त्यासाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजनांचा ही उहापोह ते आपल्या कादंबरी लेखनातून साकल्याने करतात. चारापाणी ही कादंबरी बोराडे यांच्या अशाच प्रगल्भ जीवन जाणिवांचा कलात्मक आविष्कार म्हणता येईल. या कादंबरीतून कृषीवाल्यांच्या जगण्याविषयीचे चिंतन बोराडे यांनी अभिव्यक्त केले आहे. ही कादंबरी म्हणूनच कृषी मूलक जाणिवांचा सर्वोत्तम आविष्कार ठरते.

## संदर्भ :

१.रा.रं.बोराडे, ग्रामीण साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.१९९२, पृ.९१.
२.डॉ.भीमराव वाघचौरे, रा.रं.बोराडे यांचे साहित्य स्वरूप आणि आस्वाद, विहित प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ.१९९९, पृ.१७१, १७२.
३.डॉ.रामचंद्र काळुंखे, ग्रामीण कादंबरी आकलन आणि विश्लेषण, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र. आ.२०१३, पृ.१५१, १५२.
४.मधु जामकर, घर शिवार, संपा.प्रा.चंद्रकुमार नलगे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.१९९९, पृ.१३१, १३२.